[श्री. भास्कर जाधव]

खार जमिनीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अप्रत्यक्षपणे उल्लेख केला तसेच त्यांनी दुसरा उल्लेख तिवरांची झाडे ज्याला आपण मॅनग्रोव्हज म्हणतो त्या संबंधीचा उपस्थित केला. तिवराची झाडे उगवणे हा थोडा संशोधनाचा भाग आहे. कारण मॅनग्रोव्हज कोठेही उगवतात. मॅनग्रोव्हज उगवण्याकरिता खास विशिष्ट क्षेत्र लागते किंवा त्याची निर्मिती करावी लागते किंवा ते ठराविक ठिकाणीच उगवतात अशातील भाग नाही. अशा प्रकारची थोडी झाडे उगवल्यानंतर कोणीही सांगतात की, त्या ठिकाणी मॅनग्रोव्हजची झाडे उगवली आणि त्यामुळे शेतकऱ्यांना अडचण निर्माण होते. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असावा असे मला वाटते. ती अडचण सुद्धा लक्षात आलेली आहे. यासंदर्भात आता कोणते क्षेत्र अशा पद्धतीचे आहे हे नक्की करून भातशेतीला याची अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती केल्यामुळे यानंतर अनुक्रमांक ५ वरील सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेली अर्धा तास चर्चा चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर अनुक्रमांक १ पासून अर्धा तास चर्चा चर्चेला घेण्यात येतील.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, दुपारी १२.०० वाजेपर्यंत अनुक्रमांक १ व २ वरील अर्धा तास चर्चा संपल्यातर बरे होईल. कारण विधानसभा सभागृहामध्ये माझी लक्षवेधी सूचना आहे.

श्री. दिवाकर रावते : आज सकाळी २० मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली. त्या बद्दल माझे काही म्हणणे नाही. खरे म्हणजे पहिल्या दिवशी सोमवारी आपण कधीही अतिरिक्त सत्र घेत नाही. मी यासंदर्भात प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे यांच्याशी बोललो. मी त्यांना सांगितले की, आपल्याला अर्धा तास चर्चा घ्यावयाच्या असतील तर संबंधितांना आपण दूरध्वनीवरून तसे कळवावे व त्याप्रमाणे व्यवस्था करावी. त्या बद्दल माझे काही म्हणणे नाही. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला हार घालण्याचा कार्यक्रम आहे हे माहीत असताना सकाळी १०.३० वाजता सभागृहाची बैठक ठेवण्याचे कारण नव्हते. त्यामुळे सकाळी २० मिनिटे वाया गेली. ती २० मिनिटे वाढवून द्यावीत. सभागृहाची नियमित बैठक २० मिनिटे पुढे ढकलावी. आपण जर न्याय द्यावयाचे ठरविले आहे तर व्यवस्थितपणे न्याय द्यावा. नाही तर मग प्रशासकीय प्रश्न निर्माण होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त हार घालण्याचा कार्यक्रम आहे, आणि त्यासाठी २० मिनिटे लागतील हे आपल्याला माहीत असताना सभागृहाची बैठक सकाळी १०.३० वाजता कशाला ठेवली, हा विषय येतो. त्या बद्दल मला वाद घालावयाचा नाही. आपण माननीय सभापतींची मंजुरी घेऊन विशेष सत्राच्या कामकाजासाठी २० मिनिटे वाढवून द्यावीत आणि सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी १.१५ ऐवजी १.३० वाजता सुरू करावे.

तालिका सभापती : ठीक आहे.